Golden Research Thoughts
ISSN 2231-5063
Impact Factor : 3.4052(UIF)
Volume-4 | Issue-8 | Feb-2015
Available online at www.aygrt.isrj.org

भारतातील मोगल काळातील स्त्रियांची स्थिती

शारदा बंडे

प्राचार्य, स्वा. सै. सूर्यभानजी पवार महा. पूर्णा (जं) जि. परभणी

सारांश - सहाशे वर्षाचा इस्लामी शासन काळ, स्त्री म्हणजे केवळ भोगवस्तू या मानसिकतेचा होता. ही मानसिकता केवळ इस्लाम धर्मीयांचीच नव्हें तर हिंदू धर्मीयांचीही होती हे नाकबूल करता येत नाही. भक्ती आंदोलनही स्त्रियांना ''ठेविले अनंते तैसेची रहावे'' हा निराशाजनक उपदेश केला.

प्रस्तावना

भारतात इस्लाम धर्माचा इस्लामी शासनाच्या स्थापनेपासून मोठया प्रमाणात प्रसार झाला. इस्लाम धर्माने स्त्रियांना पुरुषापेक्षा सदैव कमी दर्जा दिलेला दिसतो. स्त्री फक्त जनान खान्याच्या कैदेत कोंडलेली बंदीनी अशी अवस्था होती. हिंदू स्त्रियांचे अपहरण किंवा विवाह ही इस्लामी शासकांनी आपल्या प्रतिष्ठेची बाब मानली असली तरी मोगल काळात जनानखान्यातील स्त्रियांना आर्थिक स्वातंत्र्य असलेले दिसते. सुलताना रजिया किंवा नुरजहान ही अत्यल्प राजकीय स्त्रियांची उदाहरणे आहेत. एकंदरीत स्त्री वर्गाचा दर्जा खालावलेला व अनेक बंधनात बंदिस्त असलेला दिसतो.

□न्येचा जन्म अशुभ मानणे:

मोगल काळात हिंदू कुटूंबात कन्येचा जन्म होणे अशुभ मानले जात होते. कारण कन्येच्या जन्मामुळे कन्येच्या कुटूंबियांना अनेक समस्यांना तोंड द्यावे लागत होते. मुसलमान लोक हिंदू कन्येचे अपहरण सुध्दा करीत होते. हिंदू प्रमाणेच मुसलमानही कन्येच्या जन्मामुळे □ुश होत नव्हते. आणि पुत्राच्या जन्मावर आनंदोत्सव साजरा करीत होते. राजपुत वर्ग कन्येच्या जन्माला अभिशाप मानत होते व कन्येचा जन्म होताच तिला ठार करत होते. राजपुतान्याचा इतिहास लिहिणाऱ्या कर्नल टॉड च्या कथनानूसार कन्येचा जन्म होणे म्हणजे पतनाचा दिवस होय असे राजपूत म्हणत होते. पुत्राच्या जन्मावर जंगी मेजवानी देवून मंगल गीत म्हंटली जात होती. परंतू कन्येचा जन्म होताच □ुटुबात दु:खाचे वातावरण निर्माण होत असे. अधिक मुलींना जन्म देणाऱ्या स्त्रियांना अपमानित व्हावे लागत होते. एवढेच नव्हे तर तिला घटस्फोट सुध्दा दिल्या जात होता. हिंदू, मुसलमान, श्रीमंत,गरीब सर्वच पुत्राची इच्छा करीत होते. ईश्वराने मला पुत्र दिला तर मी शेख मुईनुद्दीन चिश्तिच्या दर्ग्यापर्यंत आगऱ्यापासून पैदल चालत जाईन ही अकबराची प्राथना शाही □ुटुंबात सुध्दा पुत्राची इच्छा प्रबळ होती असे दर्शविते.

पडदा प्रथा :

मोगल काळात पडदा प्रथा प्रचलित होती व तिचे स्वरुप अधिक दृढ झाल्याचे दिसून येते. राजकुंटूब व संपन्न कुटूंबाचे पडदा प्रथेचे अधिक कठोरतेने पालन केल्या जात होते. मोगल सम्राट व अमीर वर्गाचे लोक पडदा प्रथेचा पालनावर अधिक भर देत होते.

अकबरासारख्या उदार व प्रगतीशील सम्राटाने सुध्दा पडदा प्रथेच्या पालनावर भर देताना असा आदेश प्रसारित केला होता की जर □णतीही तरुणी गल्ली व बाजारामध्ये विना पडदा किंवा घुंघट शिवाय दिसल्यास किंवा तिने जाणूनबूजून पडदा तोडला असल्यास तीला वेश्यालयात घेवून जाऊन वेश्या व्यवसाय करु दिला पाहिजे.

मोगल काळात हिंदू व मुसलमान दोन्ही समाजात पडदा प्रथा प्रचलित होती. पडदा प्रथेचे पालन करणे गौरव व प्रतिष्ठेचे प्रतिक मानले जात होते. अमीर वर्गाच्या स्त्रिया चारही बाजूने वेढलेल्या विशाल महालामध्ये राहत होत्या. या महालात, तलाव, बगीचे व सर्वप्रकारच्या भोगविलासाच्या वस्तू उपलब्ध राहत होत्या. पर पुरुषांना स्त्रियांना भेटण्याची मोकळीक नव्हती. आजारी स्त्रिला सुध्दा पुरुष वैध पाहू शकत नव्हता. उच्च घराण्यातील स्त्रियांना बिनापडद्याचे घराबाहेर पडणे असंभव होते. गरीब व चरित्रहिन मुस्लीम स्त्रिया असेल तेव्हा त्यांच्याकरीता पडद्याची विशेष व्यवस्था केली जाई. पालखी जवळ नोकर आणि हिजडे (तृतीय पंथी) पहारेकरी म्हणून राहत होते. स्त्रियांना पडदा बाजूला कर म्हणणे मुसलमान समाजात अत्यंत अपमानाचे मानले जात होते.

शासकवर्ग किंवा राजकुटूंबात स्त्रियांच्या पडदाप्रथेच्या पालनाकरीता विशेष प्रकारची व्यवस्था केल्या जात असे. जेव्हा कधी एखादी राजकुमारी हत्तीवर बसण्याची इच्छा व्यक्त करीत असे तेव्हा त्याकरीता अतिशय सावधगिरीने व्यवस्था केली जात असे. याकरीता सर्वप्रथम बादशहाची तिला अनुमती घ्यावी लागे. फिरण्याची वेळ सकाळची निश्चित करावी लागे. तिच्या देखभालीकरीता हिजडयांचा ताफा तैनात करावा लागे. हत्तीच्या महाबताला आपला चेहरा झाकून द्यावा लागे. जेणेकरून तो राजकुमारीचा चेहरा पाहू शकणार नाही आणि नंतर मार्गातील सर्व पुरुषांचे आगमन थांबविण्यात येत होते. मोगल काळात स्त्रियांकडून चुकून जरी पडदा हटला तरी तिच्यावर फार मोठे संकट कोसळत असे. काबुलचा सुभेदार अमीर खॉन आपल्या पत्नीला केवळ एवढयाकरीताच सोडून दिले होते की दुर्देवाने तिचा पडदा बाजूला झाला होता. परंतु नूरजहा ही एक मात्र भाग पडदा पध्दतीला अपवाद होती. तीने पडदा प्रथेचा त्याग करीत जनतेसमोर येण्यास प्रारंभ केला होता. साधारण वर्गातील स्त्रीया पडदा प्रथा पाळत नव्हत्या. कारण त्यांना स्वतःच आपले संपू□ □ार्य संपन्न □रावे लागत होते. राजपुत्रामध्ये पडदा प्रथा कठोर नव्हती. स्त्रिया आवश्यकता पडल्यास युध्द स्थलावर जात होत्या.

विवाह व बहुविवाह प्रथाः

मुसलमानांमध्ये बहुपत्नीत्व विवाह प्रथा प्रचलित होती. मोगल सम्राट व अमीर वर्गाचे लोक अनेक स्त्रियांशी विवाह करीत होते. मिर्जा अजीज कोकाच्या मतानुसार एका अमिराने चार स्त्रियांशी विवाह केला पाहिजे इराणी स्त्रीशी भोग विलासाकरीता, हिंदू स्त्रीशी, मुलाचे पालन पोषण करण्याकरीता खुरासानी स्त्री बरोबर गृहकार्य करून घेण्याकरीता व हवशी स्त्री बरोबर तिला प्रस्ताडीत करण्याकरीता विवाह केला पाहिजे. अबूल फजलच्या मतानुसार अकबराला 5000 पत्नी होत्या व त्यांच्या देखभाली करीता एक वेगळा विभाग बनविण्यात आला होता. बहुविवाह प्रथेमुळे अनेक दोष निर्माण होते. स्त्रियांचा दर्जा अत्याधीक खालावला होता. त्या दासीप्रमाणे जीवन जगत होत्या व पतीच्या निर्देशानुसार कार्य करीत होत्या.

बालविवाहः

मोगल काळात बालविवाह प्रथा प्रचलित होती. हिंदु समाजात बालविवाहाची प्रथा मोगल काळाची एक विशेषता होती हे डॉ. रेखा मिश्राचे मत आहे. साधारणपणे वयाच्या दहाव्या वर्षापर्यंत मुलीचा विवाह करुन दिल्या जात होता. मुकुन्दराजच्या मतानुसार जो पिता आपल्या मुलीचा विवाह 9 व्या वर्षी करुन देतो तो भाग्यवान असून ईश्वराचा कृपापात्र मानल्या जातो. हिंदू व मुसलमान दोन्ही समाजात बालविवाहाची प्रथा प्रचलित होती की, कोणत्याही व्यक्तीने मुलीचा विवाह 12 वर्षापेक्षा कमी वयात मुलाचा विवाह 16 व्या वर्षा पेक्षा □मी वयात करु नये. विवाह प्रसंगी हुंडा देत होते. परंतू निम्न वर्गातील लोक कन्यापक्षाला धनराशी देत होते धनलोभाने □ाही लो□ आपल्यापेक्षा जास्त वयाच्या स्त्रियाबरोबर विवाह करीत होते, म्हणून अकबराने पतीच्या वयापेक्षा पत्नी 12 वर्षापेक्षा मोठी असल्यास त्या विवाहाल दंडणीय म्हणून घोषीत केले होते. राजपुतांमध्ये स्वयंवर प्रथा सुध्दा मर्यादीत स्वरुपात प्रचलित होती.

सतीप्रथाः

मोगल काळात सतीप्रथा प्रचलित होती. राजपुतामध्ये या प्रथेचे प्रचलन अधिक होते अबूल फजलने सती जाणाऱ्या स्त्रियांचे वर्गीकरण पुढील प्रमाणे केले आहे.

1. ज्या स्त्रिला आत्मदहन करण्यास विवश केल्या जाते.
2. जी स्त्री स्वेच्छेने सती जावून पतीविषयी निष्ठेचा परिचय देते.
3. कुटूंबाची रीत रीवाज व परंपरेनुसार सती जाणारी
4. इच्छेविरुध्द बळजबरीने नातेवाईकाद्वारे अग्नीत टाकल्याने सती जाणारी

वरुन सती जाणाऱ्या स्त्रियाचे प्रचलन जास्त दिसते सतीप्रथा समाप्त कर दृष्टीने मोगल सम्राटांनी काही प्रयत्न केल्याचे दिसून येते. हुमायुनने असा आदेश काढला होता की सती जाण्याकरीता राजाद्वारे अनुमती घेणे आवश्यक आहे सती जाण्यास कोणत्याही विधवेला विवश करु नये असा अकबराने आदेश काढला होता. जहांगीरानेही सतीप्रथेला थाबविण्याचे निर्देश दिले होते. 1663 मध्ये औरंगजेबाने सतीप्रथा समाप्त करण्याचा आदेश दिला होता. तरी ज्या विधवांना कोणतेही संतान नसे अशांना सती जाण्याची अनुमती दिल्या जात होती आणि ज्यांना संतान असेल त्यांना सती जाण्याची परवानगी दिल्या जात नव्हती असे असूनही मोगल काळात सतीप्रथा समाप्त होऊ श□ली नाही. मोगल काळात जोहार प्रथा ही प्रचलीत होती. राणी कर्णावतीचा जोहर प्रसिध्द आहे.

पत्नी रुपाने स्त्रीः

मोगल काळात पत्नीच्या रुपात स्त्रियांची परिस्थिती दयनीय होती आपल्या कार्याद्वारे पती, सासू, सासरे इ.संतुष्ट करावे लागे. मुसलमानाध्ये पत्नीला घटस्फोट दिल्या जात होता. परंतू हिंदू स्त्रियांना घरामध्येच राहून सर्व अन्याय सहन करावे लागे. ती सासू सासरे पती व इतर लोक जेवल्यानंतरच जेवण करु शकत होती. ती पुर्णपणे पतीवर निर्भय होती.

विधवा स्त्री ची दशाः

मुसलमानामध्ये घटस्फोट व विधवा विवाह प्रचलित होते परंतू हिंदू स्त्रीया करीता निषेध होता. पुरुष पत्नीच्या मृत्युनंतर किंवा पत्नी वांज असेल तर पुनर्विवाह करु शकत होता परंतु स्त्रियांकरीता पुनर्विवाहाची अनुमती नव्हती पत्नी कोणत्याही परिस्थितीत पतीला घटस्फोट देवू शकत नव्हती खालच्या वर्गातील स्त्रिया कधी कधी पुनर्विवाह करीत होत्या विधवा आपले केशवपन करुन व साधे जाडे भरडे पांढरे वस्त्र धारण करुन त्यागी जीवन व्यतीत करीत होत्या सकाळी विधवेचा चेहारा दिसणे अशुभ मानले जात होते. म्हणून उच्चवर्गातील स्त्रिया अशा तिरस्कृत व अपमाणीत दीर्घ आयुष्यापेक्षा सती जाणे हितावह समजत होत्या.

आईच्या रुपात स्त्रीः

मोगल काळात सामान्यपणे स्त्रियांची दशा कशीही असली तरी आई रुपाने तीला समाजात अतिशय आदराने सन्मानाच्या दृष्टीने पाहिले जाई. पुत्र आपल्या आईचा सन्मान करुन तिच्या आज्ञेचे पालन करणे आपले पवित्र कार्य समजत असे शाही मोगल कुटूंबात आईला कुर्निसात तसलीम आणि सिजदा करुन तिचा सन्मान □ल्या जात होता. राजपूतमध्येही आईला विशेष आदर व सन्मान दिल्या जात होता.
आईच्या चरणीच जन्नत (स्वर्ग) असते अशी इस्लामची शिकवण आहे.

स्त्रियांची आर्थिक स्थितीः

मोगल काळात आर्थिक दृष्टीकोनातून मुस्लीम स्त्रियांची स्थिती हिंदू स्त्रियांच्या तुलनेत चांगली होती. मुस्लीम कुटुंबात पित्याच्या संपत्तीमध्ये कन्येला समान हिस्सा प्राप्त होत होता. परंतू हिंदू स्त्रियांना पित्याच्या संपत्तीमध्ये हिस्सा प्राप्त करण्याचा अधिकार नव्हता. पतीच्या मृत्यूनंतर जीवन निर्वाह करण्याकरीता तिला पतीच्या संपत्तीमधून काही धनराशी देण्याची व्यवस्था केल्या जात असे. काही स्त्रिया □षी कार्यात आपल्या पतीला मदत करीत होत्या. काही मोलकरणीचे काम करुन उपजिवीका चालवित होत्या. काही स्त्रिया नाच गाणे □रुन तर कुणी सुती व रेशमी वस्त्र बनविण्याचा व्यवसाय सुध्दा करीत होत्या देवदासी व वेश्याव्यवसायात सुध्दा स्त्रिया होत्या पण त्यास समाजात प्रतिष्ठा नव्हती.

साहित्यीक व प्रसिध्द स्त्रियाः

मोगल काळात पडदा प्रथेचे कठोरतेने पालन केल्या जात असले तरी स्त्री शिक्षणाचा प्रचार गुरुकुल अथवा घरगुती असा □णत्या ना कोणत्या स्वरुपात होता असे दिसून येते. मोगल काळातील स्त्रियां साहित्य व कला क्षेत्रात निपूण होत्या हुमायुनची बहि□ □ुलबदन बेगम ही प्रसिध्द विदूषी स्त्री होती. तीने हुमायुननामा लिहून इतिहास व साहित्य क्षेत्रात महत्वाची कामगिरी केली. अब्दूल रहिमखानची कन्या जानबेगमचा कुराणवर पुर्ण अधिकार होता. आणि तिने कुराणवर अनेक टिका लिहल्यात सनीमा सुलताना, नुरजहान आणि झेबुनीसा सुध्दा उच्च दर्जाच्या कवीता करीत होत्या.

अशा प्रकारे मोगल काळातही अनेक कडक बंधने असतानाही विविध स्त्रियां आपले विषयात निपूण असणारे □ला□□ दाखविण्याचा प्रयत्न केलेला दिसून येतो. मग ती चांदबीबी, हमिदाबानु बे□म व दाईमा अबजादे आपल्या गुण व कर्तृत्वाने प्रसिध्दी प्राप्त □ली होती. काळ कोणताही असो प्राचीन मध्ययुगीन व आधुनीक परंतू स्त्रियाला कितीही डांबून ठेवले तर ती तेवढयाच प्रखरतेने आपली चुणूक दाखवल्याशिवाय राहत नाही.

संदर्भ □थः

1.प्रा. आर.एन. पारधी - भारतीय स्त्री जीवन □तृत्व - वेद मुद्रा प्रकाशन अमरावती 19 जानेवारी 2005.
2.दिलीप चव्हाण - स्त्री शिक्षणाचा सर्घर्ष - □णेश आर्ट केडगाव अहमदनगर 3 ऑगस्ट 2007.
3.प्रा. नितीन कऱ्हाळे - पुरुषप्रधान संस्कृतीचा मुलाम स्त्री - निर्मिती प्रकाशन औरंगाबाद 14 ऑक्टोबर, 2007.
4.प्रा. सुनिता बोर्डे - ऐतिहासिक परिप्रेक्ष्यातील स्त्रिया - शुभम पब्लि□श-स, पुणे 1 जानेवारी 2010.

शारदा बंडे
प्राचार्य, स्वा. सै. सूर्यभानजी पवार महा. पूर्णा (जं) जि. परभणी